# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पीय मागण्या**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५**

## नगर विकास विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ५४**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०५३, जिल्हा प्रशासन**<br>**रूपये:- ८,०६,२०,०००/-**<br>**श्री. वरुण सरदेसाई** |
| (१) | ५३९ | १०० | बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत दिनांक ५.५.२००८ नंतर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना राज्यशासनाच्या धर्तीवर जुनी पेन्शन योजना बंद करून नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना (DCPS) लागू केलेली असणे, हे करत असताना बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या दि. ९-९-२०१० च्या परिपत्रकात सदर योजनेमध्ये राज्य शासनाद्वारे वेळोवेळी करण्यात येणारे बदल जसे च्या तसे कर्मचाऱ्यांना देण्यात येतील असे नमुद असणे, राज्यशासनाने महाराष्ट्र शासनात परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू झालेल्या दिनांक १-११-२००५ पूर्वीची पदभरती अथवा त्या दिनांकापूर्वीच्या पदभरतीकरिता जाहिरात/अधिसूचना निर्गमित झाल्याप्रकरणातील कर्मचाऱ्यांना दिनांक २-२-२०२४ च्या शासन निर्णयान्वये जुनी पेन्शन योजना लागू केली असणे, याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने दि.९-९-२०१० च्या परिपत्रकात नमुद असल्याप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत लोकप्रतिनिधी आणि विविध कर्मचारी संघटनांकडून शासनाकडे सदर विषयात लक्ष घालण्याची होत असलेली मागणी, यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे होत असलेले अर्थिक नुकसान, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, शासनाची प्रतिक्रिया व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २०७०, इतर प्रशासकीय सेवा**<br>**रूपये:- २,६४,१३,०००/-**<br>**श्री. बापूसाहेब पठारे** |
| (२) | ३३६ | १०० | पुणे शहरातील खराडी हा परिसर अतिशय जलद गतीने विकसित होणे, वाढत्या शहरीकरणाबरोबर नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक, परिसरात आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असल्याने, खराडी येथील खराडी हडपसर बायपास रस्त्यालगत थिटे वस्ती येथे ५ वर्षापूर्वी अग्निशामन केंद्राची पुणे महानगरपालिकेकडून उभारणी करणे, सदर अग्निशमन केंद्राचे ९५ टक्के काम पूर्ण झालेले असणे, केवळ मुख्य रस्ता व अग्निशमन केंद्र यांना जोडणारा रॅम |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | नसल्यामुळे सदरचे अग्निशमन केंद्र अद्याप सुरू न होणे, त्यामुळे परिसरात आगीची घटना उद्धवल्यास दूरवरून अग्निशामन केंद्राच्या गाड्या बोलवाव्या लागणे, यामुळे आगीवर नियंत्रण आणण्यास विलंब होणे, त्यात आर्थिक व जीवित हानी होणे, सदर घटना टाळण्यासाठी खराडी येथील बांधून तयार असणारे अग्निशामन केंद्र तातडीने सुरू करणे आवश्यक, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२१७, नगरविकास**<br>**रूपये:- १,६०,५४,१२,४४,०००/-** |
| | | | **श्री. विश्वजित कदम** |
| (३) | ५०० | १० | सांगली जिल्हयातील पलूस नगर परिषद हद्दीत पुरातन काळातील गावतळे असून त्याचे सुशोभिकरण करणे आवश्यक असणे, तसेच त्याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्णाकृती पुतळे बसविणेसाठी स्थानिकांकडून मागणी असून त्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४) | ५०२ | १० | सांगली जिल्हयातील कडेगांव शहराचे वाढते शहरीकरण लक्षात घेता, सध्याची असणारी पाणीपुरवठा योजना ही अपुरी पडत असल्याने अनेक अडचणी निर्माण होत असणे, त्यामुळे नागरिकांना पाण्याची समस्यां मोठ्याप्रमाणावर भेडसावत आहे. त्यासाठी नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्रीमती ज्योती गायकवाड** |
| (५) | २४५ | १०० | धारावी येथील सनाऊल्लाह कंपाऊड मधील झोपडयांचे सन २०११ मध्ये निष्कासन करुन झोपडीधारकांचे लल्लूभाई कंपाऊड, गोवंडी येथे स्थलांतरण करण्यात येणे, उक्त महापालिकेने निष्कासन केलेली जागा रिक्त झाली असून त्याठिकाणी सध्या कचऱ्याचे साम्राज्य पसरल्यामुळे रोगराई पसरत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यांवर परिणाम होत असणे, उक्त रिक्त जागेवर उदयान व वाचनालयाची निर्मिती करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अजय चौधरी** |
| (६) | १४४ | १०० | नालासोपारा ( ता.वसई, जि. पालघर ) येथील शिवदर्शन बिल्डींग नं.३ सोसायटी, ओसवाल नगर, नालासोपारा येथील नाल्यावरील धोकादायक स्लॅब हा केव्हाही कोसळण्याच्या स्थितीत असणे, स्थानिकांनी मा.आयुक्त, वसई-विरार महानगरपालिका , विरार , मा.प्रधान सचिव,नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, तसेच वॉर्ड ऑफिसर, वसई-विरार महानगर पालिका यांच्याकडे दि.१५.१०.२०२४ रोजीच्या लेखी निवेदन दिले असणे, तरीही याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | १४५ | १०० | कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील बदलापूर (पूर्व) भागातील कवठेवाडी स्मशानभूमी-स्प्रिंग वुड पार्क सोसायटी-नवीन पनवेल बायपास हा रस्ता कच्चा असल्याने कवठेवाडीकडे जाणाऱ्या नागरीकांची होणारी गैरसाये, त्याच प्रमाणे कवठेवाडी मार्गावर असलेल्या स्मशानभुमीमध्ये अंत्यविधीसाठी येणा-या नागरीकांचीही मोठी गैरसोय होत असणे, रस्ता कच्चा असल्याने पावसाळ्यात मोठ्या प्रमाणाच चिखल होत असल्याने या रस्त्यावर वाहनधारकांसह नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, सदर कच्च्या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याबाबत वारंवार नागरीकांकडून मागणी करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (८) | ४११ | १०० | मुंबईतील उद्यानांची निधीअभावी दुरावस्था असून ज्येष्ठ नागरिकांकरिता प्रसाधनगृह व पिण्याच्या पाण्याची सोय नाही, अनेक उद्याने दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असणे, फ/दक्षिण विभागातील ३० ते ३५ उद्यांनाच्या दुरुस्तीकरिता मागील २-३ वर्षामध्ये ६० ते ७० लाख इतका तुटपुंजा निधी देण्यात येणे, सदर निधी महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात भांडवली खर्चामध्ये तरतूद केल्याने अधिकचा कर भरावा लागणे,व त्यामुळे दुरुस्तीच्या कामाकरिता निधी अपुरा पडणे, त्यामुळे उद्यांनाच्या दुरुस्तीचा दर्जा रहात नसणे, फ/दक्षिण मधील उद्यान दुरुस्ती करिता महापालिका अर्थसंकल्पामध्ये भांडवली खर्चा ऐवजी महसूल खर्चामध्ये निधी तरतूद करून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (९) | ४१२ | १०० | मुंबई शहरातील शिवडी येथील अभ्युदयनगर वसाहतीत इमारत क्र.११ शेजारी भूखंडावर आरोग्य केंद्र होणे, परंतु सदरील आरोग्य केंद्र धोकादायक झाल्याने तोडण्यात येणे, सदर भूखंड म्हाडाकडून लवकरात लवकर महानगरपालिकेस हस्तांतरण करून महानगरपालिकेच्यावतीने आरोग्य केंद्र बांधण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विकास ठाकरे** |
| (१०) | ५६६ | १० | नागपूर शहरातील मानकापूर, फ्रेंड्स कॉलनी, गोरेवाडा व दाभा येथील स्मशानभूमीचे पुनर्विकास करण्याची आवश्यकता असून या सर्व घाटांवर विजेवर चालणाऱ्या भस्मसंत्र (इलेक्ट्रीक इन्सिनरेटर) आणि पर्यावरणपूरक अंतिम संस्काराची सुविधा नसणे, त्याठिकाणी पिण्याच्या पाण्याची सुविधा नसणे, बसण्यासाठी बाक, पार्किंग, शेड, सार्वजनिक शौचालये यांसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, मुस्लिम आणि बोहरा समाजासाठी स्वतंत्र कब्रस्ताने नसणे, जुना जरीपटका व सिव्हिल लाईन्स येथील ख्रिश्चन स्मशानभूमी व सेमिनरी हिल्सवरील पारशी स्मशानभूमीत आवश्यक कामे करण्याची आवश्यकता व कराण्याबाबत मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (११) | ५८६ | १० | नागपूर शहरातील गोरेवाडा तलाव, फुताळा तलाव, पांढराबोडी तलाव, पोलीस लाईन टाकळी तलाव आणि पिली नदीचे पुनरुज्जीवन व सौंदर्यीकरण तातडीने करण्याची आवश्यकता असून नाग-पिली नदी प्रदूषण निवारण प्रकल्प आधीच मंजूर आहे. गोरेवाडा तलाव पासून पुणापूरपर्यंत पिली नदीच्या कामांना त्वरित सुरु करण्याची गरज, या सर्व जलाशयांसाठी विशेष निधी मंजूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१२) | ५८९ | १० | नागपूर शहरात पावसाळयामध्ये पाणी तुंबण्याच्या घटना वारंवार घडत असून ही ठिकाणी शोधून त्यावर उपाययोजना करणे गरजेचे असून संपूर्ण वेस्ट नागपूरसाठी वादळ निचऱ्याचा आराखडा तयार करून त्यासाठी पॅकेज मंजूर करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अनंत (बाळा) नर** |
| (१३) | ५८४ | १०० | जोगेश्वरी पूर्व येथील दुर्गानगर येथील साळसकर उदयानाच्या मागे नभूक्र २५८ वर गावकरी भवन व खेळाचे मैदान करिता आरक्षित असणे, सदर आरक्षित जागेवर गावकरी भवन, व खेळाचे मैदान करण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व याकरिता निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. बापूसाहेब पठारे** |
| (१४) | ३२४ | १०० | पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून खराडी सर्वे नंबर ४ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावे त्यांना चांगली व्यवस्था उपलब्ध व्हावी याकरिता निवासी क्रीडा संकुलनाची उभारणी करण्यात येणे, या संकुलनाचे काम जवळपास पूर्ण झालेले असणे, परंतु ठराविक काही गोष्टी अपूर्ण राहिल्यामुळे सदर संकुल अद्याप सुरू करता न येणे, याबाबत पुणे महापालिकेला वेळोवेळी पत्रव्यवहार तसेच निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती करूनही केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हे क्रीडा संकुल पूर्ण सुरू करण्यात न येणे, यामुळे पुणे महापालिकेने नागरिकांच्या कर रूपातून केलेला खर्च हा व्यर्थ जाणे, सदर संकुलनाचे कामास निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१५) | ४५९ | १०० | पुणे महानगरपालिकेमध्ये २३ गावांचा समावेश होऊन ५१ महिने झाले असणे. या गावांमधील सेवकांना पालिकेच्या नियमानुसार वेतन व वेतन फरक मिळालेला नसल्याने संबंधित सर्व सेवकांमध्ये पालिका त्यांच्यावर अन्याय करत असल्याचा संभ्रम निर्माण झाला असणे, सदरहू समाविष्ट गावांमध्ये पूर्वीपासून काम करणारे शेकडो सेवक वेतन फरकाची रक्कम मिळण्याच्या प्रतिक्षेत असणे, या संदर्भात संबंधित सेवकांकडून वारंवार विचारणा होत असूनही पुणे जिल्हा परिषदेकडून २३ गावांमध्ये सेवक भरती बाबत कमिटी नेमून या संदर्भात पूर्वीच अभिप्राय दिला गेला असणे, तरी पुणे महापालिकेतील सदर समाविष्ट २३ गावातील संबंधित सेवकांच्या वेतन फरक तसेच इतर अडचणी सोडवणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (१६) | ५९२ | १०० | पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून खराडी स.न.४ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार व्हावे, त्यांना चांगली व्यवस्था उपलब्ध व्हावी याकरिता निवासी क्रीडा संकुलनाची उभारणी करण्यात येणे, या संकुलनाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे सदर संकुल अद्याप सुरू करता न येणे, याबाबत पुणे महापालिकेला वेळोवेळी पत्रव्यवहार तसेच निधी उपलब्ध करून देण्याबाबत विनंती करूनही केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे हे क्रीडा संकुल पूर्ण सुरू करण्यात न येणे, यामुळे पुणे महापालिकेने नागरिकांच्या कर रूपातून केलेला खर्च हा व्यर्थ जाणे, यामुळे सदर संकुलनाचे कामास आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन सदर संकुल खेळाडूसाठी सुरू करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अभिजीत पाटील** |
| (१७) | १७९ | १०० | श्रीपुर महाळुंग, नगरपंचायत, माढा जि. सोलापूर येथील पाणीपुरवठा योजना ( टीएस आराखडा ) तयार असून केवळ जागाअभावी सदर योजना अदयापी प्रलंबित असणे, या योजनेकरिता जागा उपलब्ध करुन देण्यास शासन स्तरावर कार्यवाही करण्याची आवयकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. रोहित पाटील** |
| (१८) | ५०४ | १०० | तासगांव (जि. सांगली) शहरात दिव्यांग व अपंगाना शासनाकडून देण्यात येणारे अनुदान वाटपात जाणीवपुर्वक केली जाणारी टाळाटाळ, सदर अनुदान मिळण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१९) | ५०८ | १०० | तासगांव (जि. सांगली) शहरात नगरपालिकेतून शहरातील सर्व भागांत पुरेश्या प्रमाणात पाणी पुरवठा करण्यास होणारी अडचण दुर करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२०) | ५१४ | १०० | तासगांव (जि-सांगली) नगरपालिका हद्दीत नगरपालिकेने बांधलेल्या इंदिरा नगर घरकुलातील अनेक घरांचे योग्य लाभार्थ्यांना वाटप न झाल्याने काही पदाधिकारी यांनी अन्य लोकांना ताबा देण्याचा घडलेला प्रकार, घरांचे वाटप योग्य लाभार्थ्यांना करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय पोतनीस** |
| (२१) | २३४ | १०० | कलिना, सुंदर नगर मधील एमएमआरडीए च्या हददीतील डानी वूल्लैक्स नाला हा कच्च्या स्वरुपाचा असल्यामुळे आजुबाजूच्या परिसरातील माती नाल्यामध्ये पडून पाण्याचा तुंबून नाल्याचे पाणी सर्वत्र पसरुन रोगराई पसरत असणे, तसेच सी. एस. टी. रोडवर थोडया प्रमाणात पाऊस पडला तरी पाण्याचा निचरा होत नसणे, रस्त्यावर पाणी साचते त्यामुळे वाहतूकीची कोंडी होणे, याकरिता नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करुन नाला पक्क्या स्वरुपात सिमेंट कॉक्रीटीकरण करण्याची आवश्यकता, शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (२२) | २३५ | १०० | कलिना येथील ग्रॅण्ड हयात हॉटेल शेजारी खेळाच्या मैदानासाठी जागा आरक्षित असणे, सदर आरक्षित भूखंड विकसित करुन जनतेसाठी खुला करण्याकरिता मुबई महानगरपालिकेकडे वर्ग करण्याची आवश्यकता, सदर भूखंड वर्ग करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२३) | २३७ | १०० | सिटी सर्व्हे क्र.३४५४ डी व ३४५४ ई कोलेकल्याण ,वाकोला येथील सुई ज्युइली (ग्रॅण्ड हयात) यांच्याकडून सुविधा क्षेत्र अंतर्गत भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरित करण्यात येणे, उक्त सुविधा क्षेत्र अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या भूखंडावर एच पूर्व विभाग कार्यालयाकरिता सुसज्ज इमारत बांधण्याचे प्रस्तावित असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनिल प्रभू** |
| (२४) | २७४ | १०० | मुंबई महानगरपालिकेत कार्यकारी अभियंता पदासाठी पात्र असतानाही व त्यास माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये महापालिका प्रशासनाने मंजुरी दिली असतानाही १५० सहाय्यक अभियंत्यांची कार्यकारी अभियंता पदावर होणारी पदोन्नती गेली वर्षभरापासून रखडलेली असणे. सद्यस्थितीत महापालिकेत कार्यकारी अभियंता संवर्गातील स्थापत्य अभियंता व विद्युत यांत्रिकी अभियंते असे मिळून १५० हून अधिक जवळपास ४० टक्के इतके कार्यकारी अभियंता संवर्गातील पदे रिक्त असल्याचे आढळून येणे. सध्या महापालिकेत १०-१२ कार्यकारी अभियंत्यांना २ कार्यकारी अभियंता पदाचा प्रभारी कार्यभार संभाळावा लागत असणे. यामुळे विकासकामांची गुणवत्ता ढासाळून विद्यमान कार्यकारी अभियंत्यांवर अतिरिक्त कामाचा पडून कामाची गुणवत्ता ढासाळून शारिरीक व मानसीक त्रास होत असणे. महापालिकेचे संबंधित उच्च पदस्थ अधिकारी नियम पायदळी तुडवून सहाय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर कार्यभार देऊन काम करुन घेण्यात येणे. यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व महापालिका आयुक्तांना अनेक वेळा लेखी निवेदन देऊन व पाठपुरावा करुन अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे. १५० सहय्यक अभियंत्यांना कार्यकारी अभियंता पदावर पदोन्नती देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२५) | २७६ | १०० | मुंबईतील मालाड (पूर्व), दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील आप्पा पाडा, क्रांती नगर, प्रथमेश नगर, रामनगर, दुर्गानदर टेकडी, तानाजी नगर, बाणडोंगरी, कोकणीपाडा, पठाणवाडी आदि सर्वच भागातील रहिवाशी नागरिकांना गेली ६ महिन्यापासून अत्यंत कमी दाबाने पाणी पुरवठा होत असल्याने या ठिकाणी भिषण पाणी टंचाई होऊन व पाण्यासाठी रहिवाश्यांमध्ये आपसात वाद होत असल्याने संतप्त रहिवाश्यांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या पी-पूर्व प्रभाग कार्यालयावर हजारोंच्या संख्येने मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्यात केलेले असणे. या संदर्भात महापालिका आयुक्त व सहाय्यक महापालिका आयुक्तांना लोकप्रतिनिधींनी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर पालिका प्रशासनाने पाणी टंचाईची समस्या सोडविण्यासाठी कोणतीच कार्यवाही केलेली नसणे. तसेच अनेक |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | ठिकाणी गढूळ पाणी येत असल्याने नागिरकांना विविध रोगांचे प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होणे. सदरहू क्षेत्रातील रहिवाशी नागरिकांची पाणी टंचाईची समस्या सोडवून पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२६) | २७७ | १०० | मुंबईतील मालाड (पूर्व) दिंडोशी, आप्पापाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व मल्टिस्पेशालिटी ओपीडी करिता नविन यंत्र सामुग्री बसविण्यासाठी व आरोग्य ओपीडी आरोग्य केंद्र दवाखान्यात एचबीटी पॉलीक्लिनीक अंतर्गत नेत्ररोग व कान,नाक, घसा तज्ञ यासाठी आवश्यक यंत्रसामुग्री पुरवठा करण्याचे पालिका प्रशासनाने आश्वासन देऊनही अद्याप याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नसणे. यामुळे रुग्णांची मुलभूत सुविधांसाठी झालेली गैरसोय. येथील अस्वच्छ व दुर्गंधीयुक्त संचालय, सुरक्षा रक्षक नसणे, शुद्ध पिण्याचे पाणी नसणे, औषधांचा वेळेवर पुरवठा न होणे, रुग्णांच्या सोयीसाठी डॉक्टरांच्या वेळा वाढविण्याबाबत दुर्लक्ष होणे, आदि महत्वाच्या समस्या सोडविणेबाबत लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री, महापालिका आयुक्त यांना दि.२७.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झालेली नसणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२७) | २७८ | १०० | मालाड (पूर्व), दिंडोशी क्षेत्रातील पिंपरीपाडा येथील संजयगांधी राष्ट्रीय उद्यानाच्या हद्दीजवळ वाघेश्वरी मातेचे प्राचिन मंदिर हे अनेक भावीकांचे कुलदैवत असल्याने मुंबईसह महाराष्ट्रासह हजारो भावीक या मंदिराला भेट देत असल्याने हे मंदिर परिसरास पर्यटन स्थळ म्हणून घोषीत करण्यासाठी पालिकेच्या उद्यान व्यवस्थापनाने विकास आराखडा तयार केला असून पर्यटन विकास मंडळाकडे मंजुरीसाठी सादर केला असून सदरहू प्रस्तावास अद्यापही शासनातर्फे मंजूरी देण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे. या मंदिराकडे जाण्यासाठी पालनगर वन विभाग चौकी ते वाघेश्वरी मंदिर हा पादचारी रस्ता मुरुम मातीचा असल्याने दरवर्षी पावसाळ्यात वाहून जात असल्याने भाविकांची प्रचंड गैरसोय होत असणे. पर्यटन विकास आराखडा मंजूर होई पर्यंत सदरहू रस्त्यांचे पर्जन्य जलवाहिनी टाकून रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे कायमस्वरुपी काम करणे अत्यंत आवश्यक असणे. या विषयासंदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.पर्यटन मंत्री व मा.पालकमंत्री यांना लोकप्रतिनिधींनी दि.३०.०१.२०२५ रोजी लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही झालेली नसणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२८) | २८२ | १०० | मुंबईतील मालाड (पूर्व) कुरारगांव येथील तानाजी नगर मार्गावरील ओम कुराराबाद इमारतीजवळील सखल भागात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी भरून स्थानिक नागरिकांची होत असलेली गैरसोय दूर करण्यासाठी नाल्याची खोली वाढवून व संरक्षण बांधणे तसेच यामधील बाधितांचे पुनर्वसन करणेबाबत लोकप्रतिनीधींनी पालकमंत्री तथा महापालिका आयुक्तांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाह झाली नसल्याचे निदर्शनास येणे. तसेच पावसाळ्यात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | अतिवृष्टीमुळे नाल्यालगतच्या घरांमध्ये पाणी शिरून होणारी जिवीत व वित्त हानी टाळण्याकरिता मुंबई महापालिकेतर्फे नाले रुंद करण्यासाठी बाधितांचे त्याच परिसरातील पालिकेच्या बांधलेल्या इमारतीतील पीएपी गाळ्यामध्ये स्थलांतरीत करणेबाबत तसेच दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील वन क्षेत्राला लागून असलेल्या छोट्यामोठ्या नाल्यामध्ये पावसाळ्यात वाहून जाणारे दगड धोंडे रोखण्यासाठी उताराच्या ठिकाणी सिमेंट, नाला, बांध, गॅवियन बंधाराची कामे पूर्ण करुन जल व मृदा संधारणाची कामे तात्काळ करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासन तथा महापालिका आयुक्तांकडे दि.२७.०१.२०२५ रोजी मा.पालकमंत्री महोदयांना लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर कोणतीच कार्यवाही झालेली नसणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (२९) | २८३ | १०० | मुंबईतील विलेपार्ले (पूर्व) रेल्वे स्थानकासमोर कॅप्टन विनायक गोरे या पूर्व-पश्चिम उड्डाण पूल व मिलन सबवेच्या सुभाष रोड हायवेला जोडणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी व ठप्प होऊन वाहन चालक व जनतेची प्रचंड गैरसोय होत असल्याची बाब ७ महिन्यापूर्वी विधानसभागृहत चर्चा उपस्थित करुनही अद्याप यावर शासन तथा महापालिकेने कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास येणे. सदरहू ठिकाणी मुंबई महापालिकेतर्फे रस्ता रुंदीकरणाचे कोणतेही काम सुरु केले नसणे. गोखले उड्डाण पूल ते सीडी बर्फिवाला पूल या दोन पूलांमधील तफावत दूर करण्यासाठी संपूर्ण पूल वाहतुकीसाठी अद्यापही खुला न केल्याने याठिकाणी वाहुतक कोंडी समस्या अद्यापही कायम असणे. गोखले उड्डाणपूलाच्या पुनर्रबांधणीचे काम शासनाने आश्वासन देऊनही ७ महिन्यांनंतरही पूर्ण न होणे. रस्ता रुंदीकरणाच्या संदर्भात वाहतुक व समन्वय विभाग, विभाग कार्यालय आणि वाहतुक पोलीस यांच्यामध्ये योग्य समन्वय राखून रस्ता रुंदीकरणाचे काम नियोजनबद्धरित्या सुरु करुन वेळेत पूर्ण करण्याच्यादृष्टीने अद्यापही यावर कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने याठिकाणी वाहतुक ठप्प होऊन तासनतास वाहन चालक व प्रवासी जनतेस अडकून रहावे लागल्याने वेळेचे व इंधनाचे मोठ्या प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३०) | २८४ | १०० | मुंबईतील अंधेरी सबवे तसेच अंधेरी (पूर्व) अंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान अरुंद मोगरा नाल्यामुळे पावसाळ्यात पाणी भरून मोठ्या प्रमाणात नागरिकांची व वाहन चालकांना रहदारी करण्यास प्रचंड गैरसोय होत असणे. सदरहू प्रश्न सोडविण्यासाठी वर्सोवा येथील शुटींग ब्रीज ते मिल्लत नगर येथील मोगरा नाल्याची रुंदी वाढवून संरक्षण भींत बांधण्याकरिता लोकप्रतिनिधींनी महापालिका आयुक्त व अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांना दि.१२.०८.२०२४ रोजी व त्यानंतर दि.०४.०२.२०२५ रोजी स्मरण पत्र देऊनही अद्याप यावर शासन तथा महापालिकेकडून कोणती कार्यवाही करण्यात आलेली नसणे. चितळे समितीच्या अहवालानुसार सन २००५ साली अतिवृष्टीनंतर ब्रीमस्ट्रोवॅड प्रकल्पात नाल्याच्या रुंदीकरणाच्या कामाकडे शासन तथा महापालिकेचे झालेले दुर्लक्ष. सदरहू प्रकरणात |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रशासकीय दफ्तर दिरंगाईचा त्रास येथील नागरिक व वाहन चालकांना सहन करावा लागत असणे. जनतेच्या हिताच्यादृष्टीने नाल्याचे रुंदीकरण करणे व संरक्षण भिंत बांधणे हि महत्वाची बाब प्रस्तावित केली असतानाही त्यास प्राधान्यक्रम देऊन महापालिकेतर्फे निधी उपलब्ध करुन देण्याकडे झालेले जाणीवपूर्वक दुर्लक्ष. सिमेंट काँक्रीकटीकरणासाठी १०० कोटीहून अधिक निधी खर्च करण्यात येत असताना वरील जनहीताच्या नाला रुंदीकरणाच्या प्रस्तावास अद्याप मान्यता देऊन काम करण्याबाबत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे. याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३१) | २८५ | १०० | बृहन्मुंबईतील २० ठिकाणचे रस्ते, पदपथ नोगरीकांच्या रहदारीकरिता फेरीवाला मुक्त करण्यासाठी महापालिकेतर्फे कारवाई करण्यात येत असताना गोरेगांव (प) कडील गोकूळधाम परिसरातील ६ मार्ग ना-फेरीवाला क्षेत्र घोषीत करण्याची परिसरातील रहिवाशी व लोकप्रतिनिधींनी शासन व महापालिकेकडे मागणी करण्यात येणे. पदपथावर अनाधिकृत फेरीवाले असल्याने रस्त्यावरुन चालतानाही नागरिकांना अपघताचा धोका संभवत असून वाहतुक कोंडी होत असणे. सद्यस्थितीत ३२ हजार फेरीवाले पात्र असताना शहर फेरीवाला समितीच्या निवडणूकीत १.२८ लाख फेरीवाल्यांपैकी ९९ हजार फेरीवाल्यांना पात्र ठरविण्यात आले असतानाही प्रत्यक्षात २२ हजार फेरीवाल्यांचीच अंतिम यादी तयार केल्याने उर्वरित ७० हजार फेरीवाल्यांना कोणत्या निकषाच्या आधारे वगळण्यात आले याबाबत संशय निर्माण होणे. इतर राज्यांतील नियमांप्रमाणे फेरीवाल्यांच्या पात्रतेबाबत मा.न्यायालयाने अधिवास प्रमाणपत्र (डोमेसील) बंधनकारक करण्याचे राज्य शासनास निर्देश देण्यात येणे. यामुळे मुंबईतील फेरीवाल्यांचे अधिवास प्रमाणपत्र व अन्य निकषाच्या आधारे पात्र ठरवून त्यांना व्यवसाय करण्यास जागा निश्चित करुन शहरातील सर्व रेल्वे स्थानके व गर्दीची ठिकाणे फेरीवाला मुक्त करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. संजय मेश्राम** |
| (३२) | ५७८ | १० | उमरेड नगर परिषद,भिवापूर नगर पंचायत, कुही नगर पंचायत येथील पिण्याच्या पाण्यासाठी अमृत 2.0 साठी भरभोस निधि वितरीत करणे बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३३) | ५८१ | १० | उमरेड येथील उमरेड नगर परिषद, भिवापूर नगर पंचायत , कुही नगर पंचायत भागातील पिण्याच्या पाण्यासाठी अमृत अभियनासाठी निधि वितरीत करणे, शहरी भागतील रस्त्यांची दुरवस्था झालेली असणे, याबाबत स्थानिक नागरिकांनी अनेकदा चांगले दर्जेदार रस्ते, नाले, व्हावेत यासाठी प्रशासनाकडे मागणी व पाठपुरावा केला असणे, परंतु स्थानिक तिन्हीही नगर पंचायत व नगर परिषद यांची आर्थिक स्थिती चांगली नसल्याने नगरविकास विभागाने सदर तिन्ही शहरातील सिमेंट काँक्रिट रस्त्यांना भरघोस निधीची तरतूद करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्वाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (३४) | २१६ | १०० | विक्रोळी येथील कन्नमवार नगर -2 ,विकास हायस्कुलच्या बाजुस असलेला भूखंड मार्केटसाठी आरक्षित करण्यात आलेला आहे .सध्यस्थितीत आरक्षित असलेला भूखंड मोकळा असून त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता असल्याने व येथील वाढता विकास व वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन याठिकाणी मार्केटची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता ,याठिकाणी मार्केटसाठी आरक्षित असलेला भूखंड अदयावत मार्केट निर्माण करुन नागरिकांसाठी खुले करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. गजानन लवटे** |
| (३५) | २३६ | १०० | अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेचे सन-२०१६ मध्ये हद्दवाढ करण्यात आली असणे, या हद्द वाढीनुसार नव्याने समाविष्ट क्षेत्र ७.६० चौ.कि.मी. असून पूर्वीपेक्षा ते दीडपटीने वाढलेले असणे, यामुळे नव्याने समाविष्ट क्षेत्रातील विकास कामाचा नगरपरिषदेवर मोठ्या प्रमाणात भार वाढलेला असणे, त्यातच गेल्या चार वर्षात नगरपरिषदेला कोणत्याही प्रकारचा निधी मिळाला नसल्यामुळे अनेक विकास कामे प्रलंबित असणे, नगरपरिषद क्षेत्रातील विविध विकास कामांकरिता तसेच नगरपरिषेत्रातील मोठे नाले व गटारे इत्यादी काम करणेकरता नगर परिषदेने प्रस्तावित केले असणे, या बांधकामांकरिता देखील आवश्यक निधी अद्याप पर्यंत उपलब्ध झालेला नसणे, त्याचबरोबर अंजनगाव सुर्जी शहरातील प्रशासकीय नगरपरिषदेची प्रशासकीय इमारत सांस्कृतिक भवन असलेल्या जागेत असणे, त्यामुळे नगरपरिषद नगरपरिषदेने प्रशासकीय इमारतीसाठी मौजा - शहापुरा क्र. ४५/२ ब येथील उपलब्ध जागेमध्ये प्रशासकीय इमारत बांधणेचे नियोजित करण्यात आले असणे, या कामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३६) | २४६ | १०० | दर्यापूर नगरपरिषदेचे हद्दवाढ महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाच्या दि. २९ जून २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आले असणे, हद्द वाढ होण्यापूर्वी दर्यापूर नगरपरिषद क्षेत्राचे क्षेत्रफळ ४.१४ चौ.की.मी. एवढे असणे, मात्र हद्द वाढीनंतर ते ११.२७चौ.की.मी एवढे झाले असणे, तसेच सन-२०११ च्या जनगणनेनुसार पूर्वी लोकसंख्या ३६३६३ एवढी असणे, मात्र हद्दवाढीनंतर ती ४६७७२ झाली असणे, मात्र हद्द वाढ झालेले क्षेत्र हे पूर्वी ग्रामीण भागात असल्याने त्या ठिकाणी आवश्यक नागरी सोयी सुविधांचा अभाव असणे, त्यामुळे या भागात सांडपाण्याची समस्या असून नागरिकांच्या वारंवार तक्रारी प्राप्त होत असणे व नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होत असणे, तसेच जाण्या-येण्याकरिता रस्त्यांची सुविधा नसल्यामुळे पावसाळयात दळणवळणाकरीता अडचणी येत असणे, तसेच या भागात विद्युत पोल व लाईटची व्यवस्था नसल्यामुळे रात्रीच्या वेळी मोठी समस्या निर्माण होत असणे. त्यामुळे सन २०२१ मध्ये दर्यापूर नगरपरिषदेची हद्दवाढ होऊन ४ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर सुद्धा आवश्यक सोयी सुविधाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (३७) | ३७४ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपुरी नगरपरिषदमध्ये संगणका अभावी अनेक कामे कागदावरच करण्यात येणे, यात नागरिकांच्या तक्रारी, शासनाच्या अनेक योजना यासह ईतर कामे हे कागदावरच करण्यात येणे, त्यामुळे ब्रम्हपूरी नगरपरिषदेतील सर्व कामे पेपरलेस करण्यासाठी सर्व विभागात किमान ६० च्यावर संगणकाची आवश्यकता असल्याने हे संगणक खरेदी करण्यासाठी नगरपरिषदेकडे संगणीकरणासाठी अनुदान कार्यक्रम या योजने अतंर्गत निधी उपलब्ध मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३८) | ३७५ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही व सावली नगरपचायत मध्ये संगणका अभावी अनेक कामे कागदावरच करण्यात येणे, यात नागरिकांच्या तक्रारी, शासनाच्या अनेक योजना यासह इतर कामे हे कागदावरच करण्यात येणे, त्यामुळे सिंदेवाही व सावली नगरपचायत येथील सर्व कामे पेपरलेस करण्यासाठी सर्व विभागात प्रत्येकी किमान ५० याप्रमाणे १०० च्यावर संगणकाची आवश्यकता असल्याने हे संगणक खरेदी करण्यासाठी संगणीकरणासाठी अनुदान कार्यक्रम या योजने अतंर्गत निधी उपलब्ध मिळणेसाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (३९) | ३९० | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदे अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी कामे करणे अत्यांत आवश्यक असणे, निधी अभावी करण्यासाठी ही कामे करणे अडचणी निर्माण होणे, विकासाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्याची मागणी नागरिकांनी करून सुध्दा निधी अभावी सदर काम करता येत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषदे अंतर्गत सर्व प्रभागामध्ये सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी विकास कामे करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४०) | ३९१ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी कामे करणे अत्यांत आवश्यक असणे, निधी अभावी करण्यासाठी ही कामे करणे अडचणी निर्माण होणे, विकासाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्याची मागणी नागरिकांनी करून सुध्दा निधी अभावी सदर काम करता येत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सावली नगरपंचायत अंतर्गत सर्व |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | प्रभागामध्ये सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी विकास कामे करण्यासाठी निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी उपल्बध करून देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४१) | ३९३ | १० | चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी कामे करणे अत्यांत आवश्यक असणे, निधी अभावी करण्यासाठी ही कामे करणे अडचणी निर्माण होणे, विकासाच्या दृष्टीने विकासाची कामे करण्याची मागणी नागरिकांनी करून सुध्दा निधी अभावी सदर काम करता येत नसल्यामुळे नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागामध्ये सिमेंट क्राँकीट रस्ते, गटर लाईन, बगिचा, चौकाचे सौंदर्यीकरण, शहरात असलेल्या तलावाचे सौदर्यीकरण, वनिकरण, क्रिडागणाचा विकास, वाचनालय, प्रत्येक प्रभागात स्वच्छालयाचे बांधकाम इत्यादी विकास कामे करण्यासाठी किमान निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत सदर विकासकामे मंजूर करून त्यासाठी निधी मंजूर करून सिं देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४२) | ३९७ | १० | चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत शहरातील अनेक प्रभागात स्ट्रिट लाईट नसल्याने व काही ठिकाणी कमी स्ट्रिट लाईट असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, या करीता अत्याधुनिक असे नवीन स्ट्रिट लाईट लावण्यासाठी नागरिकांनी मागणी करणे, निधी अभावी सदर काम करता येत नसल्याने नागरिकात पसरत असलेले तिव्र असंतोष व संतापाचे वातावरण परिणामी चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागामध्ये प्रभागात स्ट्रिट लाईटलावणे व त्यासाठी विघुतीकरण करणे या विकास कामासाठी निधीची आवश्यकता असल्याने नगरपरिषदांना वैशिष्टयपुर्ण कामासाठी विशेष अनुदान कार्यक्रम या योजनेअंतर्गत ब्रम्हपूरी नगरपरिषद व सावली आणि सिंदेवाही नगरपंचायत अंतर्गत सर्व प्रभागात स्ट्रिट लाईट लावणे व त्यासाठी विघुतीकरण करणे या कामासाठी निधी उपल्बध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४३) | ४१८ | १० | नागपूर सुधार प्रन्यास मधील अधिकारी व कर्मचारी यांनी संगनमत करून पदाचा दुरउपयोग करून नियमबाहयरित्या अनाधिकृत अभिन्यासातील ५०० ते ६०० भुखंड धारकाच्या दस्तऐवजात बदल करून त्यांचे नियमीतीकरण करणे, हुडकेश्वर |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आणि नरसाळा येथील अनाधिकृत अभिन्यास व त्यातील अनेक भुखंड २००७ चे असतांना सुध्दा नासुप्रच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी संगनमत करून भुखंडधारकाच्या प्रत्येकातील मुख्य पानात बदल करून १९८७ सालाची नोंद दाखवून आणि त्याचा आधार घेत गुंठेवारी कायघाअंतर्गत जवळपास ५०० ते ६०० भुक्षंड व अभिन्यास नियमीत करणे, बनावट कागदपत्राच्या आधारे करण्यात आलेला हा सर्वात मोठा घोटाळा असणे, मौजा चिखली जानकीनगर प्रभाग ३४ सौ पल्लवी देशमुख ते नगरे यांच्या घरापर्यंत सिमेंट रस्त्याचे काम पुर्ण झाले असतांना सुध्दा नासुप्रच्या बांधकाम विभागातील कार्यकारी अभियंतानी या कामाचे नव्याने निविदा बोलावून एका कंत्राटदार कंपनीला ३.१७ टक्के कमी दराने देण्यात येणे, याच कंत्राटदाराच्या कंपनीला २ ते ४ टक्के कमी दराने अनेक कामे देण्यात येणे, हा कंत्राटदार स्वत: काम करीत नसून काही विशिष्ट पेटी कॉन्ट्रक्टरला देऊन त्यांच्या मार्फत काम करण्यात येणे, नागपूर सुधार प्रन्यासच्या वतीने सुरू असलेल्या रस्त्याच्या कामावर कोणताही अधिकारी/अभियंता भेट देऊन पाहणी करीत नसल्याने सिमेंट रस्त्याची कामे अंदाजपत्रानुसार करण्यात न येणे, प्रत्यक्ष पाहणी न करताच कामाचे देयक कार्यालयातच तयार करण्यात येणे, यासर्व प्रकरणाची तक्रार होऊन सुध्दा कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून संबधितावर कार्यवाही होण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (४४) | ३२५ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) मार्वे रोड या रस्त्याचे रुंदीकरणाचे काम मागील अनेक वर्षापासून रुंदीकरणाचे काम मंद गतीने सुरु असणे, मार्वे टी जंक्शन ते मढ गावापर्यंत रस्ता रुंदी करणाच्या कामास सुरुवात झाली नसणे, मार्वे टी जंक्शन ते मढ पर्यंत रस्ता अरुंद असणे, त्या ठिकाणी प्रचंड वाहतूक कोंडी निर्माण होत असणे, त्यामुळे वायू व ध्वनी प्रदूषण निर्माण होत असणे, वायू व धूळ प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे आजार होत असणे, स्थानिकांच्या आरोग्यास धोका निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४५) | ३२७ | १० | मुंबई उपनगरातील मालाड (पश्चिम) मालवणी गेट नं.८ येथील लगून रोड ते अब्दुल हमीद मार्ग या रस्त्याचे १८.३० मीटर रुंदीकरण करणे व विकास करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, महानगरपालिकेने सर्व्हे व सिमांकन केले असणे, रस्त्याच्या रुंदीकरणात ४३१ बांधकामे बाधीत असणे, बाधीतांच्या कागदपत्राची पात्रता निश्चित केली नसणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४६) | ३२८ | १० | मालवणी गेट क्र.८, मालवणी बेस्ट आगाराजवळ मालाड (पश्चिम) मुंबई येथील एम.एच.बी. इंग्रजी व उूर्द म.न.पा.शाळा क्र.३ या शाळेच्या पुर्नबांधणीचे काम संथगतीने सुरु असणे, म्हाडाच्या भूखंडाचा विकास करावयाचा झाल्यास त्यासाठी म्हाडाच्या ना हरकत प्रमाण पत्राची आवश्यकता निर्माण झाली असणे, म्हाडाने ना हरकत प्रमाणपत्र दिले असणे, मात्र म.न.पा.ने काम उशीराने सुरु केले असणे, |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | शाळेच्या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित रहावे लागत असणे, विद्यार्थी व पालक यांची गैरसोय दूर करण्याची अवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४७) | ३२९ | १० | मार्वे समुद्र किनारी मालाड (पश्चिम), मुंबई या ठिकाणी नवे बीकेसी उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असणे, त्यासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण नेमण्याचा प्रस्ताव माहे डिसेंबर,२०२४ पासून शासनाकडे प्रलंबित असणे, त्याचा अद्याप निर्णय झाला नसणे, मुंबई प्रदेश प्राधिकरण नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, सदरच्या ठिकाणी आय.टी.पार्क निर्माण करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, शासनाने ३६ हजार ५०० एकर जागेवर नविन बीकेसीचा प्रारुप आराखडा तयार करण्याची गरज निर्माण झाली असणे, परिणामी विकासास अडथळा निर्माण होत असणे, व्यावसायिक संकुले उभारणे, चित्रपट निर्मितीसाठी फिल्म सिटी उभारणे, उद्याने, मिनी थिएटर, मनोरंजन केंद्र उभारणे व विकास करणे याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी स्थानिक नागरीकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४८) | ३३० | १० | सी.टी.एस. ३५२५, मालवणी गांव, मालाड (पश्चिम), मुंबई येथील जागा सार्वजनिक आरोग्य केंद्र व प्रसूती गृहासाठी शासनाने आरक्षित केली असणे, महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम १९६६ मधील कलम २२ आणि ३७ अन्वये रुग्णांलयासाठी आरक्षित असणे, त्याठिकाणी अनधिकृत रेडी मिक्स काँक्रीट प्लांट टाकण्यात आला असणे, रेडी मिक्स काँक्रीट प्लांटवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, जागा उद्योग धंद्यासाठी आरक्षित नसणे, रेडी मिक्स काँक्रिट प्लांटमुळ स्थानिक रहिवाशांना श्वसनाचे आजार झाले असणे, त्याचप्रमाणे दमा ब्रॉकायंटिस , ह्दय रक्तवाहिन्या संबंधिचे भयंकर रोग निर्माण झाले असणे, त्याठिकाणी सार्वजनिक रुग्णालय उभारण्यात यावे याकडे संबंधित अधिका-यांनी केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी स्थानिक रहिवाशांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (४९) | ३३१ | १० | के.ई.एम. पोष्ट केंद्र / रुग्णालय, गेट नंबर ८, मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे म.न.पा. केंद्र / रुग्णालय असून केंद्र / रुग्णालयाची इमारत तयार असणे, मात्र त्याठिकाणी डॉक्टर, नर्स, शिपाई, कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे केंद्र / रुग्णालय सुरु होत नसणे, केंद्र / रुग्णालया अभावी स्थानिक रहिवाशी वैद्यकीय सोयीसुविधापासून वंचित राहत असणे, स्थानिक रहिवाशांना औषधोपचार मिळत नसणे, स्थानिक रहिवाशाला तातडीने वैद्यकीय सेवा उपलब्ध् करुन देण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, रुग्णालय सुरु करणे, केंद्र / रुग्णालय सुरु करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (५०) | ३३२ | १० | मौलाना अबुल कलाम आझाद प्रसूतीगृह प्लॉट नं.२८, गेट नं.६, एन.सी.सी. मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई येथे म.न.पा. रुग्णालय असून सदरचे म.न.पा. रुग्णालयाची इमारत बांधून तयार असणे, म.न.पा. रुग्णालयाला वैद्यकीय अधिकारी, नर्स, शिपाई, वॉचमन व इतर कर्मचारी नसणे, त्यामुळे सदरचे म.न.पा. रुग्णालय सुरु होत नसणे, परिणामी स्थानिक रहिवाशांची गैरसोय होत असणे, औषधोपचार मिळत नसणे, रुग्णालय तातडीने सुरु करण्याची असणे, त्वरीत कर्मचारी व इतर साहित्य म.न.पा.ने देण्याची गरज निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५१) | ३३३ | १० | हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना अंबोजवाडी, अझीम नगर, मालवणी गेट नंबर-७ तसेच जुलीसवाडी, मालवणी, मालाड (पश्चिम) मुंबई या तिन्ही ठिकाणी हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाना सुरु करण्याची आवश्यकता असणे, उपरोक्त परिसर झोपडपट्टी मुक्त असणे, त्याठिकाणी दुसरे म.न.पा. दवाखाना नसणे, रहिवाशांना प्राथमिक औषधोपचार देण्याच्या दृष्टीने वरील नमूद केले ठिकाणी म.न.पा.ला आरोग्य दवाखाना / केंद्र सुरु करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (५२) | ३३४ | १० | अंबोजवाडी,मालवणी,मालाड (पश्चिम) मुंबई येथील पी/उत्तर विभाग, मालाड (पश्चिम) येथील न.भू.क्र. ३५५४ (भाग) व ३५५६ (भाग) मौजे मालवणी या ठिकाणी शासनाच्या ५ एकर जमीनीवर मुस्लिम दफनभूमी व १ एकर जमीनीवर हिंदू स्मशानभूमी भूभागाचा विकास करणे आवश्यक असणे, जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा यांच्या दि.२९.५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये न.भू.क्र. ३५५४ व ३५५६ पैकी २० हजार चौ.मी.क्षेत्राचा म.न.पा. मुंबई कडे मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी भूखंड दिला असणे, तसेच मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी पोहोच रस्ता/18 दि.१९.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये न.भू.क्र. ३५५४ पैकी ७७३४ चौ.मी व ३५५६ पैकी १३,२६०.०० चौ.मी. क्षेत्राचा मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमीच्या पोहोच रस्त्यासाठी म.न.पा मुंबई जमीन दिली असणे, सदरची जागा शासनाच्या आदेशाधिन राहून आगावू ताबा बृहमुंबई म.ना.पा देण्यास मान्यता दिली असणे, तथापि मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमीच्या गत ७ वर्षापासून विकास झाला नसणे, मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमी नसल्याने स्थानिक रहिवाशांना दुरच्या मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करावे लागत असणे, यासाठी मुस्लिम दफनभूमी व हिंदू स्मशानभूमीचा विकास करण्याची आवश्यकता बृहमुंबई म.ना.पा ला निर्माण झाली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **मागणी क्रमांक: एफ-२**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३०५४, मार्ग व पूल**<br>**रूपये:- ४,१३,३४,९६,०००/-** |
| | | | **श्री. संजय पोतनीस** |
| (५३) | २३२ | १०० | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बांधण्यात येणाऱ्या बांद्रा-कुर्ला ते सी.एस.टी रोड (एशियन हाट्र हॉस्पिटल पासून मुंबई विदयापीठ मुख्य प्रवेशद्वार पर्यतचा रस्ता) यांना जोडणारा प्रस्तावित ३० मी.रुद रस्त्याच्या प्रकल्पाचे काम रखडलेले असणे, सदरहू रस्त्याच्या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. सुनील राऊत** |
| (५४) | २१३ | १०० | विक्रोळी (पूर्व ) कन्नमवार नगरमधील लेप्टनन आत्माराम सुर्वे मार्ग व स्वयंभू हनुमान रोड या दोन्ही रस्यांची अत्यंत दयनिय दुरावस्था झालेली असून स्थानिक लोकप्रतिनिधिंनी रस्त्याच्या नुतनीकरणा करीता पत्रव्यवहार करुन मागणी करुनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. गेल्या दोन वर्षापासून नागरिक,वाहन चालक या दुरावस्था झालेल्या रस्त्यावरुन ये-जा करित आहेत. नुकतेच दिनांक 1/2/2025 रोजी लोकप्रतिनिधींनी मा.आयुक्त बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे केलेला पत्रव्यवहार उक्त दोन्ही रस्ते अत्यंत महत्वाचे असून या रस्त्याचे नुतनीकरण तात्काळ होणे गरजेचे असल्याने याकरिता भरीव निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : १७ मार्च, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) नगर विकास विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई